नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 25/02/2023 (शनिवार) सायंकाळ

---

## घरफोडीचे तसेच चोरीच्या गुन्हयातील ०३ आरोपीतांना अटक व मुद्देमाल जप्त

## पोलीस स्टेशन अरोली यांची कारवाई

पोलीस स्टेशन अरोली नागपूर ग्रामीण अंतर्गत दिनांक १९/०२/२०२३ रोजी ग्राम नांदगाव ता. मौदा जि. नागपूर येथे मंदीरातील साहीत्याची चोरी झालेबाबत पोस्टे अरोली येथे अप क्र. ३४/२०२३ कलम ४५७, ३८० भादंवि अन्वये गुन्हा नोंद आहे. सदर गुन्हयातील तपासात आरोपी नामे– अभिषेक धोंडबाजी वकलकर, वय २२ वर्ष, रा. नांदगाव ता. मौदा यास ताब्यात घेवुन विचारपूस केली असता सदरची चोरी ही त्याचा सहकारी २) राहुल अशोक भांडारकर, वय २८ वर्ष, रा. नेरी ता. मोहाडी जि. भंडारा ३) अविनाश विनोद रामटेके, वय २८ वर्ष, रा. हरदोली ता. मोहाडी जि. भंडारा यांचे मदतीने केल्याचे कबुल केले. तसेच नमुद तिन्ही आरोपींनी पोस्टे अप क्र. ०९/२३ कलम ४५७, ३८० भादंवि तसेच अप क्र. ११/२३ कलम ३७९ भादंवि प्रमाणे घरफोडी व चोरी केल्याचे कबुल केल्याने नमुद तिन्ही आरोपींना अटक करून पिसीआर घेवुन नमुद तिन्ही आरोपीचे कबुलीप्रमाणे पोस्टे अरोली येथील अप क्र. ३४/२०२३ कलम ४५७, ३८०भादंवि, अप क्र. ०९/२३ कलम ४५७, ३८० भांदवि तसेच ११/२३ कलम ३७९ भांदवि मधील चोरी गेलेले आहुजा कंपनीचे ८० व्होल्ट ॲम्प्लीफायर मशीन, संगणक लिनोओ कंपनीचा जुना पावरचे मॉनीटर कीबोर्ड सीपीयु माऊस, जुने प्रोजेक्टर जुना साउंड सिस्टीम, ०२ पाण्याच्या मोटारी, ०२ हॉर्स पॉवरची, जुना लोखंडी नागर, ०२ जुने पितळी गुंड, गुन्हयात वापरलेले पांढऱ्या रंगाचे मारूती ओमनी व्हॅन क्र. एम. एच–४९/सी–४०४८ मोटार सायकल एम.एच–४९/सी–५६६६ असा एकुण ३,२५,०००/–रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. एकंदरीत पोलीस स्टेशन अरोली येथील ०३ चोरी व घरफोडीचे गुन्हे उघडकीस आल्याने तसेच सदरचे कार्यवाहीमुळे रामटेक व मौदा विभागात चोरी घटनांना अंकुश बसविण्याचे सकारात्मक कार्य अरोली येथील पोलीस अधिकारी व त्यांचे स्टाफने केले आहे.

स्दरची कार्यवाही ही मा. पोलीस अधिक्षक श्री. विशाल आनंद, मा. अपर पोलीस अधिक्षक डॉ. संदिप पखाले, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. आशित कांबळे यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण, पोस्टे अरोली ठाणेदार श्री. राजेश जोशी, पोलीस नायक विशाल महालकर, संदीप बांजनघाटे, श्याम पोकळे, पोलीस शिपाई विकी कोथरे, प्रविण सलामे यांनी केली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर